# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

23 SEP 2020
No 0551

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरून महाविद्यालयांची नोंदणी व KYC करणेबाबत तसेच अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची कार्यवाही करणेबाबतचे मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र. विसस/उशि/कोवि/शिष्य/ २०२०/२७३१- दि.१८/०९/२०२० रोजीचे पत्र सोबत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत प्रमाणे पाठविण्यात येत आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - वरील प्रमाणे

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 551
दिनांक- 23 SEP 2020

E:\Sm\Circular\Circular 2019.docx

# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण),कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
### राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com/jdhekopscholarship2@gmail.com

फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००


जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०२०/2039 दिनांक : १८/९/२०२०

प्रति,

१. अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,कोल्हापूर/मिरज
२. सहसंचालक,कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,कोल्हापूर,सांगली,सातारा
३. सहसंचालक,तंत्र शिक्षण,पुणे
४. उपसंचालक,शिक्षण विभाग,कोल्हापूर
५. कुलसचिव,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर
६. जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी,कोल्हापूर,सांगली,सातारा
७. प्राचार्य, प्रौद्योगिक प्रशिक्षण संस्था,कोल्हापूर,सांगली,सातारा
८. प्राचार्य,जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यवसाय विकास संस्था,कोल्हापूर,सांगली,सातारा
९. कृषी अधिकारी,जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय सांगली,सातारा,कोल्हापर

/-यांनी आपल्या अधिनस्त महाविद्यालयांना तात्काळ लेखी कळवून त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

विषय:- केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी NSP पोर्टलवरून महाविद्यालयांची नोंदणी व KYC करणेबाबत तसेच अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र क्र.उशिसं-२०२०-२१/केंद्र पुरस्कृत अल्प/शिष्यवृत्ती/५९८५/दि.१५/९/२०२०
२. या कार्यालयाकडील पत्र क्र.विससं/उशि/कोवि/शिष्य/२०२०/२४२४/दि.१/९/२०२०

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या एन.एस.पी पोर्टलव्दारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत १.केंद्रशासनाच्या पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना २. महाविद्यालयांतील व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना ३.अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना या तीन योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येते. सदरहू योजनेची सविस्तर माहिती संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सर्व महाविद्यालय/संस्था यांनी त्यांचे लॉगीनमधून ऑनलाईन पध्दतीने AISHE/U-DISE/NCVT/SCVT CODE सह NSP पोर्टलवर पुन्हा नोंदणी करणे आवश्यक आहे.परंतू अद्यापही काही महाविद्यालयांनी पोर्टलवर पुननोंदणी केलेली नाही. तसेच ज्या महाविद्यालयांनी नोंदणी केलेली आहे परंतु अॅप्रुव्हल घेतलेले नाही.(KYC) त्यांनी तात्काळ KYC करून घेणे आवश्यक आहे.तरच महाविद्यालयांमधील प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचे अर्ज भरता येईल.

NSP पोर्टलवरून शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३१ ऑक्टोंबर २०२० आहे. महाविद्यालयाने पुननोंदणी करून Verification (KYC) बाबतची प्रक्रिया पुर्ण केल्याशिवाय संबंधीत महाविद्यालयाला

Scanned with CamScanner

त्यांचे लॉगिनमध्ये विद्यार्थ्यांचे अर्ज दिसणार नाहीत. NSP पोर्टलवर संचालनालयाकडून Verification करून घेणे प्रलंबीत असलेल्या महाविद्यालयांचे Verification त्वरीत पुर्ण करणे आवश्यक आहे.

तरी सदर विषयाचे गांभिर्य विचारात घेऊन सर्व महाविद्यालयांनी Verification (KYC) करून घेणे. तसेच प्रलंबीत असलेल्या महाविद्यालयांनी एन.एस.पी.पोर्टलवर त्यांचे भरलेले रजिस्ट्रेशन फॉर्म आवश्यक त्या कागदपत्रांसह संचालनालयास school.dhepune@gov.in या ई-मेलवर पाठविण्यात यावे.

अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीचे योजनेचे अद्यापर्यंत अतिशय कमी प्रमाणात अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे सदर योजनेची मोठया प्रमाणात प्रसिध्दी करण्याबाबत केंद्रशासनाचे निर्देश दिलेले आहेत.याबाबतची जाहिरात दिनांक १२.०९.२०२० रोजी सर्व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच सविस्तर जाहिरात संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तथापि योजनेच्या प्रसिध्दीसाठी सर्व महाविद्यालयांनी आपल्या स्तरावरून विद्यार्थ्यांना एसएमएस व्दारे सूचना देण्यात याव्यात. सदर शिष्यवृत्तीबाबतचे बॅनर आपल्या महाविद्यालयांमध्ये लावण्यात यावेत. सदर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

**विभागीय सहसंचालक,**
**(उच्च शिक्षण)**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

प्रत- १. **मा.शिक्षण संचालक,उ.शि,पुणे यांना माहितीस्तव सादर**
२.उपकुलसचिव,(नोडल अधिकारी) महाडीबीटी शिष्यवृत्ती संबंधीत,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

Scanned with CamScanner